# जिल्हा निवड समिती, सिंधुदुर्ग जाहिरात क्रमांक ०१ /२०११

जा.क्र.सिंजिप/साप्रवि/आस्था१/परीक्षाजाहिरात/ २५५९ /११,
सामान्य प्रशासन विभाग, जि.प.सिंधुदुर्ग
दिनांक १७ / ०९ /२०११

जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या अधिपत्याखाली असलेल्या गट क व गट ड मधील रिक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र उमेदवारांकडुन परीक्षेसाठी (लेखी/मौखिक ) शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६ब, दिनांक २ ऑगष्ट २०११ व शासन परिपत्रक क्रं.एपीटी/२०११/प्र.क्रं.२२४/आस्थापना ८,दिनांक- ८ ऑगष्ट २०११,व शासन परिपत्रक क्रं.एपीटी-२०११/प्र.क्र.२२४/आस्थापना-८,दिनांक १६ ऑगष्ट २०११ मधील तरतुदीनुसार अर्ज मागविण्यात येत आहेत

परिच्छेद ०१ मधील विवरणपत्रात सरळसेवेने भरावयाच्या पदांबाबत माहिती , परिच्छेद ०२ मधील विवरणपत्रात पदांबाबत शैक्षणिक अर्हता, व प्रश्नपत्रिकेचा दर्जा इ.माहिती तसेच परिच्छेद ०३ मंध्ये अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक , परिक्षेचा दिनांक, परिक्षेची वेळ , अर्ज कोणाच्या नावे करावयाचा, अर्ज स्विकारण्याचे कार्यालय इ. माहिती अंतर्भूत केलेली आहे. पात्र उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज करावेत.

ज्या उमेदवारांनी १.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण, जिल्हा-रायगड २. जिल्हा सेवा योजन अधिकारी ,जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, सिंधुदुर्ग, ३.जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सिंधुदुर्ग इ. कार्यालयात रोजगारासाठी नावे नोंदणी केली असेल त्यांनीही पात्र असल्यास विहित शुल्क भरुन या पदांसाठी अर्ज करणे आवश्यक राहिल.

## १. सरळसेवा भरतीने भरावयाची पदे

| अ.क्र | पदाचे नांव | सामाजिक व अपंग प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीन बेरोजगार | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विस्तार अधिकारी (कृषि) वर्ग-३ | अपंग | १ | (किमान ४० % अपंगत्व) १)अल्पदृष्टी/दृष्टीक्षीणता - LV पात्र २)अ.क्रं.१चा उमेद्वार उपलब्ध न झालेस कर्णबधीर -HH पात्र (श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक) ३)अ.क्र.१ व २ चा उमेद्वार प्राप्त न झालेस अस्थिव्यंग O. L. पात्र | | | | | | |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग-३ श्रे-२ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | अपंग | १ | (किमान ४० % अपंगत्व) १) अल्पदृष्टी /दृष्टीक्षीणता-B व LV पात्र २)अ.क्रं.१ चा उमेदवार प्राप्त न झालेस कर्णबधीर - HH पात्र (श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक) ३) १ व २ चा उमेदवार प्राप्त न झालेस अस्थीव्यंग O.L. व OAपात्र | | | | | | |
| ३ | पशुधन पर्यवेक्षक | अपंग | २ | (किमान ४० % अपंगत्व) कर्णबधीर - HH पात्र (श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक) | | | | | | |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | अनु.जमाती | ४ | - | १ | १ | - | - | - | २ |
| | | अपंग | १ | (किमान ४० % अपंगत्व) १) अल्पदृष्टी /दृष्टीक्षीणता-P.S पात्र २)अ.क्रं.१ चा उमेदवार प्राप्त न झालेस कर्णबधीर - P.D. पात्र (श्रवणयंत्राने एकू शकणारे व श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक) ३) १ व २ चा उमेदवार प्राप्त न झालेस अस्थीव्यंग O.L. पात्र | | | | | | |
| अ.क्र | पदाचे नांव | सामाजिक व अपंग | भरावयाची | महिला | माजी | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | सर्वसाधारण |

| | | प्रवर्ग | एकूण पदे | | सैनिक | बेरोजगार | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | वि.जा(अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ६ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | अनु जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | अनु.जमाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | अनु.जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | अनु.जमाती | २ | १ | - | - | - | - | - | १ |
| | | वि.जा.अ | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | इमाव | ४ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ |
| | | अपंग | १ | (किमान ४० % अपंगत्व) १)अल्पदृष्टी- लोविजन पात्र / कर्णबधीर - HH पात्र (श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक) | | | | | | |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | अनु जाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | अनु.जमाती | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | भ.ज.क | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | भ.ज.ड | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | अपंग-अल्पदृष्टी<br>कर्णबधीर | १<br>२ | (किमान ४० % अपंगत्व) १)अल्पदृष्टी- लोविजन पात्र २)कर्णबधीर -HH पात्र (श्रवणशक्तीतील दोष डेसीबलसह प्रमाणपत्रात नमूद असणे आवश्यक) | | | | | | |
| ९ | परिचर | वि.जा(अ) | १ | - | - | - | - | - | - | १ |
| | | इमाव | ४ | १ | १ | - | - | - | - | २ |
| | सूचना- अपंग प्रवर्गाची पदे स्वतंत्रपणे दर्शविणेत आलेली आहेत. त्यामुळे सदर पदासाठी कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतील. तथापि दिनांक १९ मार्च २०१० चे शासननिर्णयानुसार निवड झालेल्या उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्याच प्रवर्गात समांतर आरक्षण म्हणून सामावून घेणेत येईल. | | | | | | | | | |

## २. पदांबाबत शैक्षणिक अर्हता, व प्रश्नपत्रिकेचा दर्जा

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी ( सुधारीत) | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
|---|---|---|---|---|
| १ | विस्तार अधिकारी (कृषि) | ९३००-३४८००<br>(४२०० ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त कृषि विदयापिठाची पदवी किंवा कृषितील तत्सम पदवी प्राप्त पात्र असून कृषितील उच्च अहेता धारक उमेदवारांना इतर बाबी योग्य असल्यास प्राधान्य देण्यांत येईल. | मराठी १२ वी दर्जा व कृषि संबधी प्रश्न<br>पदवी दर्जाची परीक्षा |
| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी ( सुधारीत) | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | ९३००-३४८००<br>(४४०० ग्रेड वेतन) | कोणत्याही मान्यताप्राप्त विदयापिठाची शास्त्र / कला/वाणिज्य शाखेची पदवी धारण करीत असेल आणि बी.एड् पदवी (किंवा समतुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरच्या प्राथमिक किंवा मान्यताप्राप्त वर्ग/तुकडीवर माध्यमिक शाळांतील अगर कनिष्ठ महाविदयालयातील कमीत कमी तीन वर्षे अध्यापनाचा अनुभव किंवा बी.एड् पदवी (किंवा | मराठी १२ वी दर्जा व शिक्षण शास्त्र संबधी इतर प्रश्न |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | समतुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासणीचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असेल. | पदवी दर्जाची परीक्षा |
| ३ | पशुधन पर्यवेक्षक | ५२००-२०२००<br>(+ २४०० ग्रेड वेतन) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संचालकांकडून किंवा कोणत्याही वैधानिक कृषि विद्यापिठांकडून घेण्यात येणाऱ्या पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रमात उत्तीर्ण झाले असतील किंवा तांत्रिक परिक्षा मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून घेण्यात येणाऱ्या दुग्धशाळा क्षेत्र व्यवस्थापनातील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा वैधानिक विद्यापिठामधील पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. | मराठी बारावी दर्जा, विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न, पदविका दर्जाची परिक्षा |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | ५२०० - २०२००<br>(+ २४०० ग्रेड वेतन) | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण आहेत.<br>२) महाराष्ट्र नर्सींग कौन्सिल यांची मान्यता असलेल्या संस्थेचा सहाय्यक परिचारिका प्रसाविका (ए.एन.एम) १८ महिन्याचा कोर्स उत्तीर्ण व रजिष्ट्रेशन | एस्.एस्.सी. दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवाविषयक प्रश्न |
| ५ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ५२००-२०२००<br>(+ २४०० ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण करित असतील याबाबतीत लेखा शास्त्र व लेखापरीक्षा हे विशेष विषय घेवून वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारण करणा-या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यत लेखा विषयक कामाचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देणेत येईल. | मराठी १२ वी दर्जा लेखा विषयक प्रश्न, इतर प्रश्न<br>पदवी दर्जाची परीक्षा |
| ६ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | ५२०० - २०२००<br>(+ १९०० ग्रेड वेतन) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण व महाराष्ट्र शासनाच्या शासकिय कर्मचा-याची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकिय परीक्षा विभाग शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनीटास ३० शब्द या गतीचे प्रमाणपत्र धारण करत असतील किंवा टंकलेखनामंध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले, तसेच इंग्रजी विषय घेवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेले व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केलेली संगणक/वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण करित असलेले पात्र उमेदवार | सर्व विषय एस. एस.सी दर्जाची परीक्षा. |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | ५२०० - २०२००<br>(+ १९०० ग्रेड वेतन) | १) नियुक्ती ही पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करणेत येईल.<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसलेले जे उमेदवार ३३ वर्षापेक्षा अधिक वयाचे नसतील आणि<br>(दोन) किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणासह उत्तीर्ण किंवा<br>शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा<br>शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यू) आणि<br>(तीन) संगणक हाताळणी /वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल. | सर्व विषय एस. एस.सी दर्जाची परीक्षा व कृषी पदविका दर्जाचे प्रश्न . |
| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी ( सुधारीत) | शैक्षणिक अर्हता | प्रश्नपत्रिकेचा दर्जा |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | ५२०० - २०२००<br>(+ १९०० ग्रेड वेतन) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण व महाराष्ट्र शासनाच्याशासकिय कर्मचा-याची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकिय परीक्षा विभाग शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनीटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करत असतील किंवा टंकलेखनामंध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करणेत येईल. परंतु असे की उक्त दोन भाषापैकी मराठी भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार नियुक्त केलेल्या | सर्व विषय एस. एस.सी दर्जाची परीक्षा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत इंग्रजी भाषेतील दर मिनीटास ३० शब्दाहून कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील अशा अटीवर पात्र उमेदवार. | |
| ९ | परिचर | ४४४०-७४४० (+१३०० ग्रेड वेतन) | मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण | इयत्ता ०४ थी दर्जा |

### ३. सदर अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक , परिक्षेचा दिनांक, परिक्षेची वेळ , अर्ज कोणाच्या नावे करावयाचा, अर्ज स्विकारण्याचे कार्यालय याबाबतची माहिती खालीलप्रमाणे

| अ. क्र. | पदाचे नांव | अर्ज स्विकारण्याचा अंतीम दिनांक | परिक्षेचा दिनांक | परिक्षेची वेळ | अर्ज कोणाच्या नावे करावयाचा | अर्ज स्विकारण्याचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विस्तार अधिकारी (कृषि) | २९/०९/२०११ | ऑक्टोंबरचा दुसरा रविवार दिनांक ९ ऑक्ठोंबर २०११ | सकाळी १०.०० ते ११.३० | सदस्य सचिव तथा, कृषि विकास अधिकारी , जि.प.सिंधुदुर्ग | कृषि विभाग, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | | ऑक्टोंबरचा दुसरा रविवार दिनांक ९ ऑक्ठोंबर २०११ | दुपारी २.०० ते ३.३० | सदस्य सचिव तथा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सिंधुदुर्ग | शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |
| ३ | पशुधन पर्यवेक्षक | | नोव्हेंबरचा पहिला रविवार ,दि. ०६ नोव्हेंबर २०११ | सकाळी १०.०० ते ११.३० | सदस्य सचिव तथा, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद सिंधुदुर्ग | पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | | ऑक्टोंबरचा तिसरा रविवार दि. १६ऑक्टोंबर २०११ | दुपारी २.०० ते ३.३० | सदस्य सचिव तथा, जिल्हा आरोग्य अधिकारी , जि.प.सिंधुदुर्ग | आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |
| ५ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | | ऑक्टोंबरचा तिसरा रविवार ,दि. १६ ऑक्टोंबर २०११ | सकाळी १०.०० ते ११.३० | सदस्य सचिव तथा, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग | वित्त विभाग, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |
| ६ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | | नोव्हेंबरचा पहिला रविवार ,दि. ०६ नोव्हेंबर २०११ | दुपारी २.०० ते ३.३० | सदस्य सचिव तथा, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग | वित्त विभाग, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | | ऑक्टोंबरचा चौथा रविवार दि. २३ ऑक्टोंबर २०११ | सकाळी १०.०० ते ११.३० | सदस्य सचिव जिल्हा निवड समिती तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक(लिपीक) | | नोव्हेंबरचा पहिला रविवार , दि. ०६नोव्हेंबर २०११ | दुपारी २.०० ते ३.३० | सदस्य सचिव तथा, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)जि.प.सिंधुदुर्ग | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |
| अ. क्र. | पदाचे नांव | अर्ज स्विकारण्याचा अंतीम दिनांक | परिक्षेचा दिनांक | परिक्षेची वेळ | अर्ज कोणाच्या नावे करावयाचा | अर्ज स्विकारण्याचे कार्यालय |
| ९ | परिचर | २९/०९/२०११ | नोव्हेंबरचा दुसरा रविवार ,दि. १३ नोव्हेंबर २०११ | दुपारी २.०० ते ३.३० | सदस्य सचिव तथा, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)जि.प.सिंधुदुर्ग | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग |

## पदांबाबतची माहिती - सर्व पदांकरिता समान सूचना

१. रिक्त पदांच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक, समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे इ. बाबतचे सर्व अधिकार गट क च्या पदांबाबत अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,सिंधुदुर्ग यांना तर गट ड च्या पदांबाबत अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग यांना तसेच शासनास राहतील.

२. राष्ट्रीयत्व- भारतीय

३. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. (डोमीसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

४. लिपीक वर्गीय पदांसाठी उमेदवारांची निवड करताना मुलाखती न घेता फक्त लेखी परीक्षा घेण्यात येईल. व लेखी परीक्षेमंध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड करणेत येईल. व ज्या पदांसाठी मुलाखती विहित करण्यात आलेल्या आहेत त्या संवर्गातील लेखी परीक्षेत मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ दिनांक १९ ऑक्टोबर २००७ च्या परिच्छेद ७ मध्ये नमूद केलेल्या प्रमाणानुसार तोंडी मुलाखतीस बोलावण्यात येईल. तथापि गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

५. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटोवर स्वतःची स्वाक्षरी करावी.

६. पदासाठी असलेली किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेत पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेखा, वेळापत्रक परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ.बाबतची माहिती जिल्हा परिषदेकडे उपलब्ध राहिल.तसेच सदरची माहिती जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.

७. सिंधुदुर्ग जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केलेली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावी.

८. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, तसेच जातीचा दाखला/वैधता प्रमाणपत्र इ. च्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

९. शासकिय / निमशासकिय कर्मचा-यांनी त्याचे अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांच्या परवानगीने भरावे. व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

१०. शासन परिपत्रक दिनांक ५ जून २००६ नूसार अनुसूचित जाती व जमाती वगळता इतर प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेयर) सन २०१०-११ हया (चालू वित्तीय वर्षाचे)कालावधीकरिता वैध असलेले (अर्थात दिनांक १/४/२०१० पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासोबतच सादर करणे बंधनकारक राहिल.

११. महिला आरक्षणाबाबत महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय दिनांक २५ मे २००१ मधील तरतूदीनुसार खुला प्रवर्गातील महिलांना ३०% महिला आरक्षणाचा लाभ घेणेसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेयर ) सन २०१०-११ हया (चालू वित्तीय वर्षाचे)कालावधीकरिता वैध असलेले (अर्थात दिनांक १/४/२०१० पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासोबतच सादर करणे आवश्यक आहे.

१२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २६/०८/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.( प्रतिज्ञापत्राचा नमुना जाहिरातीत जोडला आहे.)अर्जदार अविवाहित असला तरी प्रमाणपत्र भरणे आवश्यक असून अविवाहित असे नमूद करुन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

१३ .शासनाचे सामान्य प्रशासन विभाग कडील शासन परिपत्रक क्रमांक मकसी १००७/ प्र. क्र ३६/ का. ३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरिल पदासाठी अर्ज करता येईल. तथापि त्यांनी सदर ८६५ गांवातील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.

१४. अंशकालिन कर्मचा-यांनी त्यांच्या शासकिय अथवा निमशासकिय कार्यालयातून अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याबाबतचे पुरावे अर्जासोबत जोडावे

१५. शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग कडील परिपत्रक क्रं.अपंग २००९/प्र.क्रं.५९/सुधार-३, दिनांक- १६ मे २००९ अन्वये अपंग उमेदवारांना सेवेत नियुक्ती देण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैदयकिय मंडळाने तो उमेदवार संबधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करणेत येईल.

१६. एखादा उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१७. पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे व किमान गुण धारण करणा-या त्या संवर्ग/प्रवर्गाच्या उमेदवारांमध्ये ते धारण करीत असलेले शैक्षणिक अर्हता/ जाहिरातीतील नमूद प्रशिक्षण व अनुभव विचारात घेता मौखिक परिक्षेसाठी बोलावण्यात येणा-या उमेदवारांची यादी मर्यादित केली जाईल.

१८. शासनाचे सामान्य प्रशासन विभाग कडील शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब,दिनांक ५ नोव्हेंबर २००९ अन्वये मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना ज्या राखीव प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज केला असेल त्या जाती प्रवर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर नियुक्ती देण्यांत येईल.

१९. शासनाचे वित्त विभाग कडील शासन निर्णय क्रमांक अनियो /१००५/१०२६/ सेवा ०४/ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दिनांक १ नाव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नवीन परिभाषिक निवृत्ती वेतन योजना लागू राहील . मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना ( म.ना.से. निवृत्ती वेतन नियम १९८२ व म.ना.से निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना) त्यांना लागू होणार नाही .

२०. सेवायोजन , कार्यालय, एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी, माजी सैनिक कल्याण बोर्ड ,यांचेकार्यालयात ज्या उमेदवारांनी नाव नोंदणी केलेली आहे. त्यांनीही सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज करणे बंधनकाराक आहे .

२१. पदांची उपलब्ध संख्या सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेता लेख्री परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या किंवा समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत दिनांक २७/ ०६/२००८ च्या शासन निर्णयातील परि. ६ नुसार कार्यवाहि करणेत येईल

२२.सदर पदासाठीचे अर्ज कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत ( शासकिय सुट्टीचे दिवस धरुन ) कार्यालयात स्विकारले जातील. तसेच पोष्टाने / कुरियर सेवेने आलेले अर्जही स्विकारले जातील. उमेदवाराने लखोट्यावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचे नांव ठळक अक्षरात नमूद करावे. अर्ज स्विकारण्याच्या दिनांकापूर्वी किवा अंतिम दिनांकानंतर कोणत्याही माध्यमाने आलेले (पोष्टाने / कुरियर सेवेने/हस्तपोच) अर्ज विचारात घेतले जाणार

नाहीत. किवा त्याबाबत लेखी कळविले जाणार नाही.

२३. अर्जा सोबत सर्व संबधित कागद पत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात नसलेला, अपूर्ण भरलेला अर्ज , आवश्यक कागदपत्रे न जोडलेला, आवश्यक रकमेचा धनाकर्ष ( डी. डी. ) न जोडलेला फोटो न लावलेले, स्वाक्षरी नसलेले अर्ज रद्द करणेत येईल.

२४. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा . यापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२५.महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

२६. निवडणूक वा नैसर्गिक आपत्ती या कारण मुळे विहित दिवशी लेखी परीक्षा शक्य नसेल तर सोयीच्या रविवारी ती परीक्षा घेणेत येईल

२७. जाहिराती सोबत दिलेल्या नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे . त्याशिवाय केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही , व त्या बाबत कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही .

२८. अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडाव्यात.

(एस.एस.सी.व एच.एस.सी.परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, शैक्षणिक व व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नावातील बदलाबाबत पुराव्याचे कागदपत्र, अनु.जाती व अनु.जमाती वगळून अन्य मागासवर्गीय कर्मचारी यांचेसाठी आवश्यक नॉन क्रिमिलेअर दाखला, जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैधता प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त-माजी सैनिक -अपग -खेळाडू, या पदांसाठी आरक्षण मागीतलेल्या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याचा दाखला व जाहिरातीत नमूद पदासांठी आवश्यक तद्अनुषंगीक दाखले , इत्यादी)

२९.उमेदवाराच्या अर्जाची छानणी करुन प्रथम पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणेत येईल. आक्षेप हरकतीचा विचार करुन नंतर अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यांत येईल.

३०. पात्र उमेदवाराना प्रवेशपत्र पोष्टाद्वारे पाठविली जातील.

३१.उमेदवारांना लेखी परीक्षेस तसेच मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थितीबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवासभाडे अथवा भत्ता देय राहणार नाही.

३२. लेखी परीक्षेत मिळालेले गुण आणि आरक्षित प्रवर्ग विचारात घेवून शासनाने विहित केलेल्या प्रमाणात मुलाखत पात्र उमेदवारांची यादी घोषित करण्यांत येईल. मुलाखतीसह संपूर्ण निवड प्रक्रिया लेखी परीक्षेच्या दिनांकापासून पाच दिवसात (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) पूर्ण होणे अपेक्षित असल्याने मुलाखतीचा दिनांक व मुलाखत पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग च्या प्रशासकिय भवनात प्रसिद्ध करण्यांत येईल. तसेच याबाबतची माहिती सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ www.zpsindhudurg.com या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल. कोणत्याही उमेदवाराला मुलाखतीबाबत वैयक्तिक पत्राद्वारे कळविले जाणार नाही. त्यामुळे मुलाखतीचा दिनांक व मुलाखत पात्र उमेदवारांची यादी जाणून घेणे ही उमेदवारांची वैयक्तिक जबाबदारी राहिल. (अपरिहार्य कारणास्तव अथवा जिल्हा निवड समितीचे नियंत्रणाबाहेरील कारणास्तव निवड प्रक्रियेस जास्त कालावधी लागू शकतो)

३३.निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.

३४.भरती प्रक्रिये सदर्भातील सर्व अंतिम निर्णय जिल्हा निवड समितीचे राहतील.

३५. उमेदवारांनी या भरतीप्रक्रियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिद्ध होणारी माहिता व सूचना www.zpsindhudurg.com या वेबसाईटवर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यत वरील वेबसाईट तसेच दैनिक वृत्तपत्रे उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

३६. **कंत्राटी ग्रामसेवक :-** अ) कंत्राटी ग्रामसेवकांना लागू असलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत विहीत नमुन्यातील हमीपत्र दिल्यावरच कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन नियुक्ती देण्यात येईल.

ब) कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन नियुक्ती दिलेल्या उमेदवाराला दरमहा रुपये २५००/- एकत्रित मानधन दिले जाईल व दरमहा नियमित ग्रामसेवकांप्रमाणे प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

क) ज्या उमेदवारांची कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन नियुक्ती होईल त्याला नियुक्ती स्विकारणेपुर्वी रक्कम रु. १०,०००/- इतकी सुरक्षा ठेव ठेवावी लागेल.

ड) ग्रामसेवकांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीवर तीन वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येईल. तीन वर्षानंतर नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी समाधानकारक रित्या पुर्ण केल्यानंतर मंजुर पदांच्या उपलब्धतेनुसार सेवा नियमित केली जाईल.

**३७. ज्या पदांच्या लेखी परीक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी आहेत अशा पदांबाबत उमेद्वार कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करु शकतो. दोन्ही पदासाठी अर्ज केल्यास संबंधित उमेद्वार एका पदाच्या अपात्रतेबाबत वैयक्तीक रित्या जबाबदार राहील.**

३८. वयोमर्यादा :-

१) जाहिरातीत नमुद सर्व पदांसाठी उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास १८ वर्षा पेक्षा कमी नसावे तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ पेक्षा जास्त नसावे . मागासवर्गियांसाठी ५ वर्षासाठी शिथिलक्षम.

२) अपंग यांचेसाठी ४५ वर्षा पर्यंत वयोमर्यादा राहील

३) माजी सैनिक यांचेसाठी ४५ वर्षा पर्यंत वयोमर्यादा राहील .

४) पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांसाठी ४६ वर्षे वयोमर्यादा राहील.

अपंग,माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, उमेदवारांसाठी सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने मागासवर्गीय अपंग,माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त उमेदवारांनाही ४५ वर्षापर्यंतचीच सवलत राहील. तसेच पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांसाठी सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने मागासवर्गीय पदवीधर/पदविधारक अंशकालीन उमेदवारांनाही ४६ वर्षापर्यंतचीच सवलत राहील.

## ३९. विशेष सुचना :-

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशासन २०००/ प्र.क्र. ५/ २००१/ ३२ / दिनांक २०/०७/२००२ अनुशंगिक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदा करित अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी बाबतचे खालील नमुद केलेले प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांका पासून दोन वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहिल अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

१) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C' किंवा 'O' स्तर किंवा 'A' स्तर किंवा 'B' स्तर किंवा 'C' स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

किंवा

२) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३) कंत्राटी ग्रामसेवक यांचे बाबत उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल.

**४०. परिक्षा शुल्क** :- अर्जा सोबत खाली नमुद केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे नावे भारतीय स्टेट बँक सिंधुदुर्ग नगरी ( कोड क्र ४५११) येथे देय होणारे धनाकर्ष ( डी. डी. ) जोडण्यात यावा. धनाकर्षाच्या मागे मेदवाराने आपले नांव, पदाचे नांव संपूर्ण पत्ता लिहावा. अन्य नावाने काढलेला व राष्ट्रीय कृत बँकेतून न काढलेला धनाकर्ष ( डी. डी.) स्विकारला जाणार नाहीत.

| अ.क्र | पदाचे नाव | मागासवर्गीय उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क | इतरउमेदवारांसाठी परीक्षा शुल्क |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) /कनिष्ठ सहाय्यक(लेखा) | ७५/- | १५०/- |
| २ | उर्वरित सर्व पदांसाठी | १००/- | २००/- |
| ३ | माजी सैनिकाना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही | | |

## ४१.लेखी परिक्षेचे स्वरुप :-

| अनु. क्र | संवर्ग | मराठी संबधीत गुण | | इंग्रजी संबधीत गुण | | सामान्यज्ञान संबधीत गुण | | गणित संबधीत गुण | | बुद्धिमापन संबधीत गुण | | तांत्रिक प्रश्न संबधीत गुण | | एकूण | | मुलाखती करिता गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | | |
| १ | विस्तार अधिकारी (कृषि) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० | २० | २०० |
| २ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० | २० | २०० |
| ३ | पशुधन पर्यवेक्षक | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० | २० | २०० |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | ३२ | ८० | ७२ | १८० | २० | २०० |
| ५ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | १० | २५ | ३२ | ८० | ७२ | १८० | २० | २०० |
| ६ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | ० | ० | ० | ० | ८० | २०० | ० | २०० |
| ७ | कंत्राटी ग्रामसेवक | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | १० | २५ | ० | ० | ३२ | ८० | ७२ | १८० | २० | २०० |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | २० | ५० | ० | ० | ० | ० | ८० | २०० | ० | २०० |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | परिचर | २५ | २५ | ० | ० | २५ | २५ | २५ | २५ | ० | ० | ० | ० | ७५ | ७५ | २५ | १०० |

**(गट क पदांसाठी)**

सही/-
सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

सही/-
अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग

**(गट ड पदांसाठी)**

सही/-
सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

सही/-
अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

टिप :- सदरची जाहिरात जिल्हा परिषद, सिंधुदुर्गच्या www.zpsindhudurg.com या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येत आहे.

## अर्जाचा नमुना

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक** **सिंधुदुर्ग जिल्हा परिषद**

या ठिकाणी पासपोर्ट आकाराचे स्वत:चे छायाचित्र लावावे व त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

**विषय :- .................................................... पदासाठी अर्ज**

१.स्वत:चे नांव (मराठीत) ..........................
वडिलांचे नांव ..........................
आडनांव ..........................
दुरध्वनी/भ्रमणदुरध्वनी क्रमांक
२.संपूर्ण नांव इंग्रजीत (Block Letter) ..........................
३.पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह)
घर क्रमांक/मार्ग क्रमांक इत्यादी ..........................
गांव/शहर ..........................
पोस्ट .................. शहर ..................
जिल्हा .................. पिनकोड ..................

४.अर्जदार कोणत्या प्रवर्गाचा आहे.खालीलपैकी लागू असलेल्या जात प्रवर्गाचा क्रमांक चौकटीत ( √ ) खुण करावी.

| अ.जाती | अ.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | अमागास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ(A) | NT(B) | NT(C) | NT(D) | SBC | OBC | NON BC |
| | | | | | | | | |

अ) मागासवर्गीय असल्यास जात .................. पोटजात ..................

ब) अर्जदाराने कोणत्या प्रवर्गातुन अर्ज सादर केला आहे.(प्रवर्ग नमुद करावा)

क) वैधता प्रमाणपत्र आहे /नाही.

ड) वि.जा.(अ),भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),वि.मा.प्र.,इ.मा.व. मधील पुरुष व महिला तसेच अराखीव महिला असलेस उन्नत व प्रगत गटातील आहात काय? आहे / नाही.

ई) असल्यास नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सोबत आहे काय? आहे / नाही

५. अर्जदार स्त्री आहे की पुरुष

६. राष्ट्रीयत्व १. भारतीय २. अभारतीय

७. अ.राज्याचे अधिवासी (डोमिसाईल्ड) आहात काय? आहे / नाही
ब. अर्जदार १० जुलै २००८ च्या शासन परिपत्रकानुसार महाराष्ट कर्नाटक सिमा भागातील विविहत ८६५ गावातील रहिवासी आहे काय? आहे / नाही
८. जन्म ठिकाण .................. गाव .................. तालुका .................. जिल्हा ..................

९. अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये) (शालांत प्रमाणपत्राप्रमाणे) अंकात
अक्षरी ..........................

१०. दिनांक १७/०९/२०११ रोजीचे पूर्ण वय

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

११ .अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता(टंकलेखन/संगणक अर्हता इ.) (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशील.)

| अ.क्र. | परिक्षेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | शाळा / संस्था / विद्यापीठाचे नांव | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

१२. अर्जदाराने नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयाकडे नांव नोंदणी केली आहे काय ? आहे/नाही
नोंदणी क्र. / दिनांक

१३. अपंग आहे काय? आहे / नाही
अ) असल्यास अपंगत्वाचा प्रकार ( अंध / अल्प दृष्टी ) ( मुकबधिर / कर्ण बधिर ) (अस्थिव्यंग )

ब) अपंगत्वाचे प्रमाण (४०% पेक्षा जास्त/४०%पेक्षा कमी)

क) अपंगत्वाचे स्वरुप (कायमस्वरुपी/तात्पुरते)

ड) अपंग उमेदवारास लेखणीक हवा असल्यास तसे नमुद करावे. होय / नाही

१४. अर्जदाराने प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन बेरोजगार/खेळाडू/माजी सैनिक/महिला या समांतर आरक्षणापैकी कोणत्या आरक्षणाची मागणी केलेली आहे काय? आहे / नाही

अ) असल्यास कोणते आरक्षण

ब) त्याबाबतचे आवश्यक प्राधिकरणाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? आहे / नाही

१५. उमेदवाराने अंशकालीन कर्मचारी म्हणून काम केलेबाबत सक्षम प्राधिकरण यांचा दाखला असल्यास अंशकालीन सेवेचा कालावधी

| अ.क्र. | सेवा केलेल्या कर्मचा-याचे नाव व पत्ता | पासून | पर्यत | वर्ष | महिने |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१६.सोबत जोडलेला धनादेश क्रमांक दिनांक नादेश रक्कम

वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अंर्हता माझ्यापाशी आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमावण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहीन. व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहाणार नाही.

<u>अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडाव्यात.</u>

एस.एस.सी.व एच.एस.सी.परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, शैक्षणिक व व्यावसायीक परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नावातील बदलाबाबत पुराव्याचे कागदपत्र, अनु.जाती व अनु.जमाती वगळून अन्य मागासवर्गीय कर्मचारी यांचेसाठी आवश्यक नॉन क्रिमिलेअर दाखला, जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैधता प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त -माजी सैनिक -अपंग -खेळाडू, अंशकालीन दाखला,या पदांसाठी आरक्षण मागीतलेल्या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याचा दाखला व जाहिरातीत नमूद पदांसाठी आवश्यक तद्अनुषंगीक दाखले , इत्यादी.

**ठिकाण :-**

**दिनांक :-** **अर्जदाराची सही / नांव** ..............................

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटंबाचें प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाच्या नमुना - अ**

**प्रतिज्ञापन ( नियम ४ पहा )**

मी.श्री /श्रीमती/कुमारी .............................. श्री .............................. याचा /यांची / मुलगा/ मुलगी/ पत्नी वय -----------वर्षे राहणार -------- याव्दारे पुढीलप्रमाणे असे ज हीर करते करते करतो की,

१) मी ---------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ------------------------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------- आहे. ( असल्यास जन्मदिनांक नमूद करावा )

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च , २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन , याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :** / /२०११

**अर्जदाराची सही**

**( नाव )**